N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): नंदुरबार **P.S.**(ठाणे): विसरवाडी

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0126 **Year** (वर्ष): 2025

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):15/04/2025 19:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार **Date From** (दिनांक पासून): 15/04/2025
   **Time Period** (कालावधी): पहर 4 **Date To** ( दिनांक पर्यंत): 15/04/2025
   **Time From** (वेळेपासून): 11:10 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 12:15 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 15/04/2025 **Time** (वेळ): 19:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 020

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 15/04/2025 19:09 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पूर्व, 1 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पशु वैद्यकीय रुग्णालय, विसरवाडी पशु वैद्यकीय रुग्णालय,नवापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शमुवेल गेबु वळवी
(b) **Guardian's Name (पालक चे नाव) :** गेबु वळवी
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वावडी,नवापुर ,विसरवाडी,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वावडी,नवापुर ,विसरवाडी,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8999695891

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हर्षल गोपाळ पाटील | | पालक का नाम : गोपाळ पाटील | 1. कोचरु ,रावेर जि जळगाव, विसरवाडी,नंदुरबार,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 400/ | 400.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

400.00

**11.Inquest Report / U.D. case No., If any**
**(इनक्वेसट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 15/04/2025

माझे नाव शमुवेल गेबु वळवी, वय 32 वर्षे, व्यवसाय- षेती रा. वावडी ता. नवापुर जि. नंदुरबार, मो.नं. 8999695891

समक्ष हजर होऊन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी वडील गेबु, आई लक्ष्मीबाई, पत्नी करिष्मा असे कुटंुबासह राहतो व षेती करून माझा व परिवाराचा उदरनिर्वाह करतो. माझे चुलत मामा मोहन षामजी गावीत रा. बिलगव्हाण ता. नवापुर हे असुन त्यांना षबरी योजने अंतर्गत सहा महिन्यापुर्वी जर्सी गाय मिळाली होती. सदर गायीचे पालन पोषण करण्याची मामाची परिस्थीती नसल्याने, सदरची गाय ही मी माझ्याकडे पालनपोषण करण्यासाठी घेवुन आलो होतो. आम्ही देखील आमचे वावडी येथील षेतात राहत असल्याने गाय ही आमच्या सोबत होती. सदर गायीचा मी बजाज अलाएन्स कंपनी मार्फत विमा काढलेला होता.

सुमारे दोन-तीन आठवडयापासुन आमची जर्सी गाय आजारी होती, तिचेवर आम्ही औषधोपचार करीत होतो. परंतू दिनांक 10/04/2025 रोजी पहाटे 05/00 सुमारास आमची गाय मयत झाली होती. सदर आमची जर्सी गाय ही षबरी योजने अंतर्गत मिळाली असल्याने व तिचा बजाज अलाएन्स कंपनी मार्फत विमा काढलेला असुन नमुद विम्याची रक्कम मिळण्या कामी मयत गायीचे षवविच्छेदन करणे आवष्यक होते म्हणुन दिनांक 10/04/2025 रोजी सकाळी मी पशु वैदयकीय अधिकारी, कार्यालय, लहान सावरट ता.नवापुर येथील जनावरांचे डॉक्टर यांना माझ्या मोबाईल फोनवरुन संपर्क केला असता ते बाहेरगावी गेल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर मी नवापुर येथील पशु वैदयकीय अधिकारी डॉ. श्री. अषोक वळवी यांना फोन केला असता, त्यांनी मला विसरवाडी येथील पषु वैदयकीय अधिकारी डॉ. हर्षल पाटील यांचा मोबाईल नंबर दिला त्यानंतर मी डॉ. हर्षल पाटील यांना फोन करुन माझे चुलत मामा मोहन गावीत यांना षबरी योजने अंतर्गत मिळालेली जर्सी गाय हि आजारपणामुळे मयत झाली आहे. तिचे पोस्टमार्टम करायचे आहे, तरी आपण वावडी येथे आमच्या शेतात येवुन गायीचे पोस्टमार्टम करावे बाबत विनंती केली. त्यानंतर पशु वैदयकीय अधिकारी डॉ. हर्षल पाटील हे मयत गायीचे पोस्टमार्टम करण्यासाठी आमच्या वावडी गावाच्या षेतात सदर दिवषी सकाळी 9/45 वाजेच्या सुमारास आले होते. त्यानंतर त्यांनी मयत जर्सी गाईचे पोस्टमार्टम केले होते व मला पी.एम. नोट्स दिली होती. त्यानंतर डॉ. हर्षल पाटील यांनी सदर गायीचे पोस्टमार्टम केल्याच्या मोबदल्यात सुरुवातीस 400/- रूपये मागणी केली होती. परंतू माझ्याकडे आता एवढे पैसे नाही, असे मी त्यांना सांगितले असता, त्यांनी मला सांगितले की, तुझ्याकडे ऑनलाईन पैसे असतील तरी चालेले ते मला गुगल पे अॅपवरून मला पाठवुन दे, असे सांगितले. परंतु मी त्यांना सांगितले की, माझ्याकडे अकॉऊट फक्त 150/- रुपये आहेत, तेव्हा त्यांनी मला सांगितले की, मला 150/- रूपये गुगल पे ला टाकुन दे, आणि उर्वरित बाकी असलेले पैसे सुध्दा मला गुगल पे वर टाकुन दे, तुझे काम अजुन माझ्याकडे बाकी आहे, तु मला भेटायला विसरवाडी दवाखान्यात ये, तेव्हा मी तुला पंचनाम्याचा फॉरमेट देईल किंवा तुझ्या व्हॉटसअॅप नंबरवर फॉरमेट टाकुन देईल त्याप्रमाणे त्या फॉरमेट मध्ये माहिती भरुन मला सर्व कागदपत्रे आणुन दे, त्यानंतर तुझे प्रकरण पुढे जाईल. त्यानंतर डॉ. हर्षल पाटील हे शेतातुन निघुन गेले. त्यानंतर मी सदर गाय खड्डयात दफनविधी करीत असतांना डॉ. हर्षल पाटील हे मला वारंवार फोन करुन माझ्याकडे पुन्हा 400/- रुपयाची मागणी करीत होते.

त्यानंतर मी जागेवर येवुन गायीचे पोस्टमॉर्टम करण्याबाबतची पषु वैदयकीय डॉक्टरांची फी बाबत माहिती काढली असता, गायीचे जागेवर येवुन पोस्ट मार्टम केल्यास त्यांची फी फक्त 150/- रूपये एवढीच असल्याचे मी खात्री केली. आणि मी यापुर्वी गायीचे शवविच्छेदन करण्याची फी 150/- रुपये डॉ. हर्षल पाटील यांना यांच्या गुगल पे अॅपवर मोबाईल क्रमाक 8779712317 वर दिले आहेत. तरी देखील पशु वैदयकीय अधिकारी डॉ. हर्षल पाटील यांनी माझे चुलत मामा मोहन षामजी गावीत रा. मेनतलाव ता. नवापुर यांना षबरी योजने अंतर्गत जर्सी गायीचे शवविच्छेदन करून पंचनामा फॉरमेट देण्याच्या मोबदल्यात 'फी' च्या स्वरूपात 400/- रूपये लाचेची मागणी केली.

पशु वैदयकीय अधिकारी डॉ.हर्षल पाटील हे मागीत असलेले 400/- रुपये फी हि कुठलीही षासकीय फी नसुन लाचच आहे याची मला खात्री झाल्याने मी अॅन्टी करप्षन ब्युरो, नंदुरबार येथील माझ्या ओळखीचे पोलीस हेमंतकुमार महाले यांना संपर्क व त्यांना तळोदा येथे येण्याची विनंती केली. यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती नेहा सुर्यवंषी मॅडम, पोलीस हेमंतकुमार महाले व इतर पोलीस स्टाफ असे दिनांक 11/04/2025 रोजी विसरवाडी गावाचे अलीकडे भरडु गावाचे पुलाखाली मोकळया जागेत आले तेथे पंचांसमक्ष मी लेखी तक्रार दिल्यानंतर झालेल्या चर्चेअंती व सुचनांनुसार पषु वैद्यकीय अधिकारी, विसरवाडी येथील डॉ. हर्षल पाटील यांची लाचेची पडताळणी करणेसाठी पषु वैद्यकीय अधिकारी, विसरवाडी येथे पाठविले असता पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षल पाटील यांचे लाचेची पडताळणी कारवाई दरम्यान लाचेची मागणी केल्या बाबत पडताळणी कारवाई करण्यात आली. ज्यात डॉ. हर्शल पाटील पषु वैद्यकीय अधिकारी, नेमणुक- पषु वैद्यकीय दवाखाना विसरवाडी यांनी पंच क्रमांक 01 श्री. सुदाम सुदाम मधुकर गावीत, महसुल सेवक, तहसील कार्यालय, नवापुर यांच्या समक्ष आमचे मयत जर्सी गायीचे षव विच्छेदन केल्याच्या मोबदल्यात शासकीय फी व्यतिरीक्त जास्तीचे 400/- रुपये लाचेची मागणी केल्याचे व सदर लाचेची रक्कम जी.पे. (गुगल पे) करण्यास सांगीतल्याचे स्पश्ट स्वरुपात लाचेची मागणी केली असल्याचे पंचांसमक्ष निश्पन्न झाले आहे. दिनांक 11/04/2025 रोजी या बाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा पंचांसमक्ष करण्यात आला आहे.

यानंतर डॉ. हर्शल पाटील पषु वैद्यकीय अधिकारी, नेमणुक- पशु वैद्यकीय दवाखाना विसरवाडी यांनी मला मयत गायीचा पंचनामा फॉर्मेट तयार करुन त्यावर ग्रामसेवकाची सही घेवुन मयत गायीचे काढलेले फोटो डेव्हलप करणे व गटाचे बँक पासबुक , मामा मोहन गावीत यांचे आधार कार्ड व गायीचा बिल्ला अषांची पुर्तता झाल्यानंतर गुगल पे वर 400/- रुपये टाकायचे असे सांगितले परंतु मध्यतरी षासकीय सुटया असल्याने दिनांक 15/04/2025 रोजी दवाखान्यात जाऊन भेटण्या बाबत सांगितले होते. त्यानुसार आज दि.15/04/2025 रोजी मी, पोलीस निरीक्षक श्रीमती नेहा सुर्यवंषी मॅडम व पंच क्रमांक 01 श्री. सुदाम गावीत व पंच क्रमांक 02 श्री. प्रषांत वळवी व सापळा पथकातील सर्व पोलीस अंमलदार असे सर्वजण नंदुरबार विसरवाडी रोडवर भरडु गावा जवळील भरडु कॉलनी येथे आलो. श्रीमती नेहा सुर्यवंषी मॅडम यांनी लोकसेवक डॉ.हर्षल पाटील, पषु वैद्यकिय अधिकारी यांनी सांगितल्या प्रमाणे ऑनलाईन गुगल पे वर देणेकामी लाचेची रक्कम 400/- रुपये गुगल पे च्या अकॉऊट ला आहेत अगर कसे ? याबाबत विचारणा केली असता मी माझ्या मोबाईल मध्ये गुगल पे च्या अकॉऊटवर 500/- रुपये षिल्लक असल्याचे श्रीमती नेहा सुर्यवंषी मॅडम व दोन्ही पंचांसमक्ष दाखविले.

यानंतर पोलीस निरीक्षक, श्रीमती नेहा सुर्यवंषी मॅडम यांच्या सुचनेनुसार पोह/विजय ठाकरे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व सॅनडिक्स कंपनीचे मायक्रो एस.डी.-32 जी.बी.चे एक नवीन सीलबंद मेमरी कार्ड असे बाहेर काढुन माझे व दोन्ही पंच यांचे समक्ष हजर केले. सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर कसे हातळण्यात येते याची सविस्तर माहिती पोलीस निरीक्षक श्रीमती नेहा सुर्यवंषी मॅडम यांनी मला व दोन्ही पंचाना दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती नेहा सुर्यवंषी मॅडम यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये कसलेही रेकॉर्डीग नसल्याची खात्री केली व पोलीस निरीक्षक श्रीमती नेहा सुर्यवंषी मॅडम यांच्या सुचनेनुसार पोह/विजय ठाकरे यांनी व्हॉईस रेकॉर्ड माझ्या शर्टाच्या आत असलेल्या बनियनला लावुन ते सुरु केले.

यानंतर लोकसेवक डॉ.हर्षल पाटील यांना भेटण्यासाठी विसरवाडी येथील पषु वैद्यकीय रुग्णालय येथे मी व पंच क्रमांक 1 श्री. सुदाम मधुकर गावीत यांच्यासह गेलो असता, तेथे डॉ.हर्षल पाटील हे नव्हते. तेथे जावुन मी तेथील शिपाई चौरे यांना विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, डॉक्टर येथे नाहीत, बाहेर गेले आहेत. त्यानंतर मी शिपाई चौरे यांना सांगितले की, डॉक्टर यांना फोन लावा, त्यानंतर त्यांनी त्यांचे मोबाईल वरुन डॉ.हर्षल पाटील यांना फोन लावला आणि सांगितले की, मेनतलाव चे आले आहेत त्यांचे सोबत बोलुन घ्या, त्यानंतर डॉ. हर्षल पाटील यांना शिपाई चौरे यांनी विचारले की, पैसे बाकी होते का ? त्यावर डॉ. हर्षल पाटील यांनी त्यांना सांगितले की 400/- रुपये बाकी आहेत. व षिपाई चौरे यांनी मला बोलण्यासाठी फोन दिला व मोबाईल फोनचा स्पिकर ऑन करुन डॉ.हर्षल पाटील हे माझ्या सोबत बोललो की, देवुन टाका त्यांच्याकडे , तुम्ही कॅष आणली असेल तर, तेव्हा मी त्यांना विचारले की, किती तेव्हा मला त्यांनी सांगितले की, तिनशे दे, त्यांना मी सांगितले की, जी पे करुन देतो, माझ्याकडे कॅष नाही. डॉ.हर्षल पाटील यांनी सांगितले चालेल , माझ स्कॅनर आहे, मी सांगितले हा हा त्यावर डॉ.हर्षल पाटील यांनी सांगितले की, तुझ्याकडे ऑल रेडी, टाकुन दे त्याच्या वरती. त्यानंतर मी व पंच सुदाम गावीत असे पोलीस निरीक्षक श्रीमती नेहा सुर्यवंषी मॅडम यांना भेटलो वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर मी डॉ.हर्षल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या गुगल पे च्या अकाउंटला माझ्या गुगल पे वरुन 300/- रुपये टाकुन दिले व त्यांना माझ्या मोबाईल वरुन फोन केला, डॉ. हर्षल पाटील यांना विचारले की, पैसे आले का ? त्यावर त्यांनी हो आले, असे म्हणुन माझ्याकडुन गुगल पे वरुन पैसे स्विकारले.

त्यानंतर डॉ.हर्षल पाटील यांनी मला फोन करुन सांगितले की, तुम्ही पशु वैद्यकीय रुग्णालय येथे या, मी पोस्ट ऑफिस मधुन येतो. त्यानंतर डॉ.हर्षल पाटील हे पषु वैद्यकीय रुग्णालय, विसरवाडी येथे आले मी त्यांना भेटलो व ठरल्याप्रमाणे सापळा पार्टी मधील पोलीस निरीक्षक श्रीमती नेहा सुर्यवंषी, स्टाफ व पंच नं. 2 श्री. प्रषांत वळवी हे सक्रीय होवुन तात्काळ सदर ठिकाणी आले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्रीमती नेहा सुर्यवंषी मॅडम यांनी लोकसेवक डॉ. हर्षल पाटील यांनी त्यांच्या मोबाईल वर गुगल पे ला लाचेची स्विकारलेली असल्याने डॉ. हर्षल पाटील यांचा मोबाईल पंचांसमक्ष जप्त केला. या बाबत दि. 15/04/2025 रोजी यशस्वी सापळा पंचनामा पंचांसमक्ष केला आहे. त्यावेळी डॉ. हर्शल पाटील यांना पोलीस निरीक्षक श्रीमती नेहा सुर्यवंषी मॅडम यांनी पंचांसमक्ष नाव गांव विचारता त्याने त्याचे नाव हर्शल गोपाळ पाटील , वय 29 वर्शे व्यवसाय - नोकरी , पशु वैद्यकीय अधिकारी, नेमणुक- पशु वैद्यकीय दवाखाना विसरवाडी ता. नवापुर जिल्हा नंदुरबार मु. रा. कोचरु ता. रावेर जि.जळगाव ह.मु. टिचर कॉलनी विसरवाडी ता. नवापुर जिल्हा नंदुरबार असे सांगितले.

तरी लोकसेवक डॉ. हर्षल पाटील, पषु वैदयकीय अधिकारी यांनी माझे चुलत मामा मोहन षामजी गावीत रा. मेनतलाव ता. नवापुर यांना शबरी योजने अंतर्गत मिळालेली जर्सी गाय आजारपणा मुळे मयत झाल्या नंतर तिचा बजाज अलायन्स विम्याची रक्कम मिळण्या कामी नमुद मयत गायीचे षवविच्छेन झाले नंतर षवविच्छेनाची षासकीय फी 150/-रुपये मी लोकसेवक डॉ. हर्षल पाटील, पशु वैदयकीय अधिकारी यांच्या मोबाईल वरील गुगल पे वर टाकलेली असतांना लोकसेवक डॉ. हर्षल पाटील, पशु वैदयकीय अधिकारी यांनी पंचनामा फॉर्मेट देण्याच्या मोबदल्यात 'फी' च्या स्वरूपात आणखी 400/- रूपये त्यांच्या मोबाईल वरील गुगल पे वर टाकण्या बाबत पंचांसमक्ष स्पश्ट लाचेची मागणी करुन नमुद मागणी केलेली लाचेची रक्कम 400/-रु·या रक्कमेत तडजोड अंती 300/- रुपये त्यांचे मोबाईलवर गुगल पे अकॉऊंटला दि.15/04/2025 रोजी 11/00 वाजेचे दरम्यान पंचांसमक्ष स्विकारली आहे, म्हणुन माझी डॉ.हर्षल गोपाळ पाटील, पशु वैद्यकीय अधिकारी, विसरवाडी ता.नवापुर यांच्या विरुध्द कायदेषीर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहीली असता , माझ्या सांगणे प्रमाणे बरोबर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Narendra Gopal Sable(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
विसरवाडी पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Narendra Gopal Sab
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**